आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 14/10/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 219 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# महाराष्ट्र सर्वात आघाडीवर–मुख्यमंत्री

## महाराष्ट्रात गुंतवणुक करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**मुंबई : कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, या शब्दात महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील संस्था आणि उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.**




गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व अधिकारी यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रुपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगण, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते.

यूकेच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चांनंतर विविध महत्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक बाजारपेठांशी थेट जोडते.

पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरातील कुशल मनुष्यबळ, सक्षम औद्योगिक समूह आणि जागतिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या अनुभवी भागीदारांचे मजबूत जाळे ही महाराष्ट्राची ताकद आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरु करण्याची परवानगी मिळाली आहे.

'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल', 'युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ अॅबर्डिन' यासारखी जागतिक विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि एआय इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन, संस्था आणि प्रतिभा एकत्र येतील.

# नवीन वर्षाच्या सुरुवातीला महामार्गांवर 'हवाई रुग्णवाहिका' सेवा

## समृद्धी, मुंबई-पुणे द्रुतगती आणि मुंबई-गोवा महामार्गांवर विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**मुंबई: राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरु करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच 'गोल्डन अवर', हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरु शकते, अशी भूमिका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मांडली.**



मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, आरोग्य विभागाचे संचालक संजय काटकर, वाहतूक पोलीस विभागाचे अधीक्षक डॉ. सुनील भारद्वाज यांच्यासह मोटार वाहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्पासाठी 15 नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात दरवर्षी सुमारे 15 हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती आहे. यापैकी अनेक अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळणे हे मोठे आव्हान ठरते. विशेषतः महामार्गावरील गंभीर अपघात, वाहतूक कोंडी, रुग्णालयापर्यंतचे अंतर आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांची उपलब्धता या बाबी लक्षात घेता, अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यासाठी अधिक सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग या महत्वाच्या मार्गावर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेअंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

हवाई रुग्णवाहिका सेवेसह अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे, रस्ता सुरक्षा निधीतून आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रमाणित कार्यपद्धती विकसित करणे, अशा उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 14/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शांता शेळके यांच्या गीतांचा 'बकुळगंध' दरवळला

## स्वर, आठवणी आणि साहित्याचा सुरेल संगम!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : मराठी साहित्यविश्वातील ज्येष्ठ कवयित्री, गीतकार आणि आपल्या शब्दप्रतिभेने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या शांताबाई शेळके यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित 'बकुळगंध संगीत संध्या' या कार्यक्रमात गीत - संगीत, साहित्यिक आठवणी आणि भावभावनांचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी - चिंचवड शाखेच्या वतीने निगडी पुणे येथील शांताबाई शेळके सभागृहात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.**




शांताबाईंच्या अजरामर गीतांना स्वरांची साथ देत कलाकारांनी रसिकांच्या मनात आठवणींचा बकुळगंध दरवळला.या कार्यक्रमाच्या औपचारिक उद्घाटन प्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी - चिंचवडचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष राजन लाखे आणि उपाध्यक्षा डॉ. रजनी शेठ उपस्थित होते. गायक कलाकार डॉ. अनिरुद्ध टोणगावकर, अविनाश पाठक, गीता सुतार, आणि रिचा राजन यांनी आपल्या सुरेल सादरीकरणातून मैफलीला रंगत आणली. कार्यक्रमाची सुरवात रिचा राजन यांनी सादर केलेल्या 'गजानना श्री गणराया' या मंगलगीताने झाली. त्यानंतर 'तोच चंद्रमा नभात', 'हिची चाल तुरूतुरू', दाटून कंठ येतो', 'ही वाट दूर जाते', 'घन राणी घन राणी साजना', 'माझे राणी माझे मोगा', 'जीवन गाणे गातच रहावे', 'शूर आम्ही सरदार', 'शारद सुंदर', 'मी डोलकर डोलकर' आदी शांताबाईंच्या एकाहून एक सरस गाण्यांनी मैफल रंगत गेली.

तर भाऊसाहेब भोईर यांनीही सहभाग घेऊन 'मनाच्या धुंदीत लहरीत ये ना' हे गीत सादर करून रसिकांना भावधुंद विश्वात नेले.

# स्वच्छतेच्या दुर्गा सांभाळताहेत संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराच्या स्वच्छतेची धुरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहर स्वच्छ ठेवण्यासाठी रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसराची नियमित स्वच्छता होणे आवश्यक असते. ही स्वच्छता प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सफाई सेवकांचे नियोजन, कामावर देखरेख आणि विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील महिला आरोग्य निरीक्षक, आरोग्य मुकादम या सांभाळत आहेत.**



स्नेहल सोनवणे, संतोषी कदम, स्नेहा चांदणे, स्नेहल सुकटे, कोमल फर्डे, रश्मी तुंडलवार, रुपाली साळवे, महिला आरोग्य मुकादम प्रमिला शिंदे, शिवगंगा नागरगोजे, रुक्मिणी बिनवडे शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.शहरातील विविध भागांतील स्वच्छता कामांचे नियोजन करणे, सफाई कर्मचाऱ्यांशी समन्वय साधणे आणि कामकाजावर लक्ष ठेवणे, अशा जबाबदाऱ्या त्या पार पाडतात. स्वच्छतेविषयक उपक्रम प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी त्यांना सातत्याने प्रयत्न करावे लागतात. दैनंदिन कामकाजातून शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यास त्यांचे योगदान मिळत आहे.

स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने शहरातील स्वच्छतेचा दर्जा उंचावणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे याला महत्त्व आहे.

या कामात महिला आरोग्य निरीक्षक, आरोग्य मुकादम, सफाई सेवकांच्या मदतीने विविध स्वच्छता उपक्रम राबवतात. नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन होण्यासाठी प्रयत्न करणे, यावरही भर दिला जातो.

स्वच्छतेसोबतच पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारीही महत्त्वाची आहे. 'माझी वसुंधरा' अभियानाच्या उद्दिष्टांशी सुसंगत पर्यावरणपूरक सवयींना प्रोत्साहन देणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे, या प्रयत्नांत आरोग्य विभागाची भूमिका महत्त्वाची ठरते. स्वच्छ आणि पर्यावरणपूरक शहर घडविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना महिला आरोग्य निरीक्षक तसेच, आरोग्य मुकादम कामातून हातभार लागतो.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 14/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अपघातांच्या मालिकेमुळे नागरिक संतप्त!

## वृद्ध खुशाल किसन हंबीर यांचा अपघात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राहू-वाघोली : राहू-वाघोली रस्त्यावर एमएसआयडीसीच्या माध्यमातून सुरू असलेल्या रस्त्याच्या कामातील कथित हलगर्जीपणा आता वाहनचालकांच्या जीवावर बेतत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. रस्त्यावरील असमान पृष्ठभाग, माती आणि खडीचे ढिगारे तसेच सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. याच परिस्थितीत खुशाल किसन हंबीर या वृद्ध व्यक्तीचा अपघात झाला असून, त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर अहिल्यानगर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.**





### कुटुंबीयांकडून नुकसानभरपाईची मागणी

हंबीर यांच्या उपचारासाठी अंदाजे दोन ते अडीच लाख रुपये खर्च अपेक्षित असल्याचे सांगण्यात येत आहे. रस्त्याच्या कामादरम्यान आवश्यक सुरक्षा उपाययोजना न केल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत असून, संबंधित ठेकेदाराकडून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

**रस्त्याच्या कामात सुरक्षेचे नियम धाब्यावर?**

राहू-वाघोली रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. मात्र, कामाच्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेले रिफ्लेक्टर, बॅरिकेड्स आणि स्पष्ट सूचना फलक पुरेशा प्रमाणात नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्यावरील अडथळे स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघाताचा धोका अधिक वाढत आहे.काही ठिकाणी रस्त्यावर माती आणि खडी पसरलेली असल्यामुळे दुचाकी घसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे चित्र आहे. रस्त्याचे काम सुरू असताना वाहतुकीचे योग्य नियोजन आणि धोकादायक ठिकाणी पुरेशी सुरक्षा व्यवस्था करणे आवश्यक असतानाही याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे.

**वृद्धाच्या अपघातानंतर नुकसानभरपाईची मागणी**

खुशाल किसन हंबीर यांच्या अपघातामुळे रस्त्याच्या कामातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वृद्ध व्यक्तीला गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर उपचारांच्या खर्चाचा मोठा आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपघाताच्या कारणांची चौकशी करून संबंधित ठेकेदाराची जबाबदारी निश्चित करावी आणि हंबीर कुटुंबीयांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

**प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा**

रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स व रिफ्लेक्टर लावावेत, सूचना फलक उभारावेत आणि रस्त्यावर पसरलेली माती व खडी तातडीने हटवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करून कामाच्या दर्जाची आणि सुरक्षा व्यवस्थेची तपासणी करावी. ठेकेदाराच्या कामात निष्काळजीपणा आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे.अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. रस्त्याचे काम करताना नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड होऊ नये, तसेच भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करा, अन्यथा हंडा मोर्चा

## नगरसेवक संतोष कोकणे यांचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांना निवेदन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 22 विजयनगर काळेवाडी मधील विविध भागांत गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, नागरिकांना अनियमित आणि कमी दाबाने पाणी मिळत आहे. या समस्येमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत करण्याची मागणी नगरसेवक संतोष अंकुश कोकणे यांनी केली आहे.**

यासंदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक 22 विजयनगर काळेवाडी मधील विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत करून नागरिकांना नियमित वेळेत आणि पुरेशा दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज आहे. मात्र, पाणीपुरवठा अनियमित होत असल्याने पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापरासाठी पाणी मिळवताना नागरिकांची गैरसोय होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य त्या उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 14/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 2.77 कोटींच्या डिजिटल रेडिओग्राफी मशीनची किंमत योग्य आहे का?

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 1000 MA Digital Radiography System या वैद्यकीय उपकरणाच्या खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेल्या अंदाजित किमतीचा आधार काय आहे? देशातील विविध शासकीय संस्थांमध्ये समान किंवा तुलनीय तांत्रिक वैशिष्ट्ये असलेल्या उपकरणांच्या खरेदी किमतींची तुलना केल्यास या निविदेतील किंमत योग्य असल्याचे स्पष्ट होईल का? या बाबी अधिकृत कागदपत्रांच्या आधारे तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात यावी, अशी विनंती नगरसेवक संदीप बाळकृष्ण वाघेरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



संदीप वाघेरे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ई-निविदा क्रमांक GEM/2026/B/7797530 अंतर्गत संबंधित वैद्यकीय उपकरणाची अंदाजित किंमत 2 कोटी 77 लाख 56 हजार रुपये नमूद करण्यात आली आहे. या किमतीसाठी कोणते दरपत्रक, बाजारभाव, पूर्वीचे शासकीय खरेदी व्यवहार अथवा आर्थिक निकष आधारभूत मानण्यात आले आहेत, याची माहिती उपलब्ध करून घेण्याबरोबरच संबंधित उपकरणाच्या खरेदी किमतीचे सविस्तर विश्लेषण करण्यात यावे, अशी विनंती वाघेरे यांनी केली आहे. वाघेरे यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार, दिल्ली येथे डिसेंबर 2021 मध्ये संबंधित मशीन सुमारे 1 कोटी 12 लाख रुपये किमतीत पाच वर्षांच्या वॉरंटीसह पुरविण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

तसेच, 2025 मध्ये कोटा, राजस्थान येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित मशीन सुमारे 1 कोटी 40 लाख रुपये किमतीत पुरविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील विविध संस्थांच्या खरेदी व्यवहारांबाबतही निवेदनात आकडेवारी देण्यात आली आहे.

त्यानुसार, जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे सुमारे 2 कोटी 49 लाख 52 हजार 375 रुपये, जनरल हॉस्पिटल, वाशी येथे 2 कोटी 77 लाख 56 हजार रुपये, तर जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे सुमारे 3 कोटी 79 लाख रुपये इतकी खरेदी किंमत असल्याची माहिती सादर करण्यात आली आहे.

# ‘मॅगझिन’च्या ट्रेलरची सर्वत्र चर्चा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**आपल्या आजूबाजूच्या जगापलीकडे जाऊन आपल्या व्यक्तिरेखांकडे पाहणारे चित्रपट मोजकेच असतात. त्याहूनही कमी चित्रपट असे आहेत, जे आजच्या Gen Z पिढीची अस्वस्थता, कुतूहल, स्वतःची ओळख शोधण्याचा प्रवास आणि घराशी असलेलं गुंतागुंतीचं नातं पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न करतात. मोठ्या पडद्यावरचा भव्य सिनेमॅटिक अनुभव डोळ्यांसमोर ठेवून साकारलेला ‘मॅगझिन’ प्रेक्षकांना कथा, दृश्य आणि ध्वनी यांचा एकत्रित अनुभव देण्यासाठी सज्ज आहे.**




शुभम संजय शेवडे लिखित-दिग्दर्शित ‘मॅगझिन’ चित्रपटाची कथा शहरात वाढलेल्या, सिनेमावर प्रेम करणाऱ्या एका तरुणाभोवती फिरते. तो महाराष्ट्रातील आपल्या मूळ गावी जातो आणि तिथे आलेले काही अनपेक्षित अनुभव हळूहळू त्याचा स्वतःकडे, आजूबाजूच्या जगाकडे आणि ‘घर’ या संकल्पनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतात.हा चित्रपट 23 ऑक्टोबर 2026 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. पडद्यामागची ‘मॅगझिन’ची गोष्टही चित्रपटाइतकीच वेगळी आहे. कोणत्याही मोठ्या स्टुडिओच्या पाठबळाशिवाय या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. शुभम शेवडे यांनी त्यांच्या पत्नी अपर्णा कुलकर्णी यांच्यासोबत मिळून या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचा मोठा भाग महाराष्ट्रातील दत्तवाड येथे शूट करण्यात आला. हे अपर्णा कुलकर्णी यांचं मूळ गाव असून, दिग्दर्शकाने छोट्या टीमसोबत तिथे अनेक महिने राहून आणि काम करून चित्रपट पूर्ण केला आहे.शुभम शेवडे यांच्यासाठी हे गाव केवळ शूटिंगचं ठिकाण नव्हतं, तर ‘मॅगझीन’ची गोष्ट ज्या जगात आकाराला आली तेच हे गाव होतं. तिथे बराच काळ राहिल्यामुळे चित्रपटाच्या टीमला तिथला निसर्ग, माणसं आणि रोजचं जीवन जवळून अनुभवता आलं. त्यामुळे हे जग केवळ कॅमेऱ्यासमोर उभं करण्याऐवजी ते प्रत्यक्ष जगता आलं.

चित्रपटाच्या क्रिएटिव्ह टीममध्ये शुभम शेवडे आणि प्रतीक हंडोरे यांनी पटकथा आणि संवाद लिहिले आहेत. दत्ताराज कुवळेकर यांनी सिनेमॅटोग्राफीची जबाबदारी सांभाळली आहे. विलक्षण कंडवाल यांनी पार्श्वसंगीत दिलं असून, निखिल लांजेकर आणि हिमांशू आंबेकर यांनी साउंड डिझाइन केलं आहे.‘मॅगझिन’च्या संगीताची बाजूही या चित्रपटाचं एक खास आकर्षण ठरणार आहे. अनेक वर्षांनंतर संगीतकार सलील कुलकर्णी आणि गीतकार संदीप खरे या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकत्र आले आहेत. “चल जाऊ पुन्हा परतून घरला रे” सलील कुलकर्णींच्या संगीताची, संदीप खरे यांच्या शब्दांची आणि शुभंकर कुलकर्णी यांच्या आवाजाची ही सुरेल सांगड ‘मॅगझिन’च्या ‘घराकडे परतण्याच्या’ भावनेला अधिक खोल करते.चित्रपटाचं ओरिजिनल बॅकग्राउंड स्कोअर उत्तराखंडचे संगीतकार विलक्षण कंडवाल यांनी तयार केलं आहे.

या संगीतविश्वाची आणखी एक खासियत म्हणजे ‘मॅगझिन’चा ओरिजिनल साउंडट्रॅक स्वतंत्रपणे प्रेक्षकांसमोर आणला जाणार आहे.स्वतंत्रपणे तयार झालेला चित्रपट असूनही ‘मॅगझिन’ची स्वप्नं त्याच्या छोट्या निर्मितीच्या चौकटीपेक्षा खूप मोठी आहेत. राघव वर्तक, डॉ. निलेश माने, सुदर्शन देशमुख आणि वेदिका कुलकर्णी या नव्या कलाकारांना या चित्रपटातून संधी मिळाली आहे.त्यांच्यासोबत अतुल परचुरे, शिवाजी साटम आणि किशोर कदम हे मराठी चित्रपटसृष्टीतील तीन अनुभवी कलाकारही आहेत. नव्या आणि अनुभवी कलाकारांचा हा मेळ चित्रपटाला वेगळी बहुपिढीची छटा देतो. मराठी सिनेमाच्या वारशाचा आदर राखत त्याला नव्या पद्धतीने पाहण्याचा प्रयत्न यातून दिसतो.